**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी ५ फेब्रुवारीला मतदान, मतमोजणी ७ फेब्रुवारीला /महानगरपालिका निवडणुकांसाठीचा प्रचार संपला

- भारतात जैवतंत्रज्ञान क्षेत्रात अभूतपूर्व परिवर्तन झालं असून असंख्य नव्या संधी उपलब्ध झाल्या असल्याचं केंद्रीय गृह मंत्र्यांचं प्रतिपादन

- अमेरिकेच्या कारवाईचा सामना करण्यासाठी पूर्णपणे सज्ज असल्याचं इराणचं प्रत्युत्तर

**आणि**

- दहा मिनिटांत वस्तू घरपोच देण्याची सुविधा बहुतांश डिलिव्हरी कंपन्या लवकरच बंद करणार

**<><><><><><>**

महाराष्ट्रातल्या १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत केली. यामध्ये पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजी नगर, परभणी, धाराशिव, लातूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदांच्या आणि त्या जिल्ह्यातल्या पंचायत समितीच्या निवडणुका आयोगाने आज जाहीर केल्या.

***होल्ड बाइट वाघमारे 1***

या निवडणुकांसाठी १६ जानेवारी पासून अर्ज भरायला सुरुवात होईल आणि २१ जानेवारीपर्यंत ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरता येतील. २२ जानेवारीला

अर्जांची छाननी होईल आणि २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. याच दिवशी अंतिम उमेदवारांची यादी जाहीर होईल आणि मतदान चिन्ह वाटप होईल. ३ तारखेला मध्यरात्रीपर्यंत उमेदवारांना प्रचार करता येईल आणि ५ फेब्रुवारीला सकाळी साडे ७ ते साडे ५ दरम्यान मतदान होईल. या निवडणुकीत EVMचा वापर होणार असून विधानसभेच्या मतदार आहे.

**<><><><><><>**

महाराष्ट्रातल्या महानगरपालिका निवडणुकांसाठीच्या प्रचाराच्या तोफा आज थंडावल्या. राज्यातल्या २९ महापालिकांमधल्या ८९३ प्रभागांमधल्या २ हजार ८६९ नगरसेवकांसाठी परवा मतदान होणार आहे. यासाठी एकूण १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत. सकाळी साडे ७ ते साडे ५ वाजेदरम्यान हे मतदान होणार आहे.

**प्रचाराचा** अखेरचा दिवस असल्यानं सर्व राजकीय पक्षांनी जोरदार प्रचार केला. मुंबईत भाजपा प्रणित महायुती आणि राज आणि उद्धव ठाकरे यांच्या पक्षात महानगरपालिकेवर सत्ता मिळवण्यासाठी चुरस सुरू आहे. त्यामुळे दोन्ही बाजूंनी प्रचाराचा धडाका सुरू होता. दोन्ही बाजूच्या नेत्यांनी एकमेकांवर आरोप प्रत्यारोप केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी आपापल्या पक्षांच्या उमेदवारांसाठी राज्यभरात प्रचारसभा घेतल्या. तर उद्धव आणि राज ठाकरे यांनी मुंबई, ठाणे आणि नाशिक महानगरपालिकेवर लक्ष केंद्रित करत मतदारांना साद घातली. काँग्रेसच्या नेत्यांनीही विविध ठिकाणी प्रचारसभा घेतल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज नागपुरात रोड शो घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत रोड शो केला तर अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये रोड शो केला. राज ठाकरे यांनीही आज पुण्यात प्रचार केला.

**<><><><><><>**

मुंबईच्या महापौराच्या संदर्भात जात-धर्माचे उल्लेख मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासह विविध राजकीय पक्षांनी केले आहेत. याप्रकरणी पुरावे मिळाल्यावर संबंधितांना नोटिस पाठवू, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज दिली. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या विरोधातल्या तक्रारीप्रकरणी महापालिका आयुक्तांकडून अतिरिक्त व्हिडीओ मागवले आहेत. तसंच निवडणूक निरीक्षक इक्बाल सिंह चहल यांच्याकडून अहवाल मागवला आहेत, असं त्यांनी सांगितलं.

या निवडणुकीत आचारसंहिता भंगाच्या ३४१ तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यापैकी २८० तक्रारींवर कारवाई पूर्ण झाल्याचं वाघमारे म्हणाले.

**<><><><><><>**

राज्यात महापालिका निवडणुका होत आहेत. या अनुषंगानं प्रत्येक सजग आणि सुजाण नागरिकानं येत्या १५ तारखेला आपला मतदानाचा हक्क बजावावा आणि योग्य उमेदवाराला निवडून द्यावं, असं आवाहन अभिनेता सारंग साठे यांनी केलं आहे.

**होल्ड बाईट साठे (२९ सेकंद)**

**<><><><><><>**

भारतात जैवतंत्रज्ञान क्षेत्रात अभूतपूर्व परिवर्तन झालं असून असंख्य नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत, असं प्रतिपादन केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी आज केलं. गुजरातमधल्या गांधीनगर इथं गुजरात जैवतंत्रज्ञान संशोधन केंद्राच्या बीएसएल-चार बायोकंटेनमेंट सुविधेचं पायाभरण शहा यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते.

***होल्ड... बाईट- अमित शहा***

गेल्या १० वर्षांत जीवशास्त्र क्षेत्रातले स्टार्टअप्स, जैव-इनक्युबेटर्स आणि पेटंट्सच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचं शहा म्हणाले. तत्पूर्वी, गांधीनगर

जिल्ह्यात मनसा महानगरपालिकेच्या २६० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांची पायाभरणी आणि लोकार्पणही शहा यांनी केलं.

<><><><><>

इराण अमेरिकेच्या कारवाईचा सामना करण्यासाठी पूर्णपणे तयार असल्याचं इराणचे परराष्ट्र व्यवहार मंत्री अब्बास अरागाजी यांनी म्हटलं आहे. गेल्यावर्षी जून महिन्यात अमेरिकेने इराणवर केलेल्या लष्करी हल्ल्यापेक्षा यावेळी इराण अधिक सुसज्ज आहे, असं त्यांनी सांगितलं. आर्थिक अस्थैर्याच्या पार्श्वभूमीवर इराणमधे सध्या सरकारविरोधी निदर्शनं तीव्र झाली असून सरकार निदर्शकांवर बळाचा वापर करत आहे. यात आतापर्यंत दोन  हजार जण मृत्युमुखी पडल्याचं सांगितलं जात आहे.

<><><><><>

१० मिनिटात वस्तू घरपोच देण्याची सुविधा बहुतांश कंपन्या लवकरच बंद करणार आहेत. यामुळं या वस्तू घरपोच पोहोचवणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेची निश्चिती होईल आणि त्यांना कामासाठी पोषक वातावरण मिळेल. यासंदर्भात Blinkit, Zepto, Zomato आणि Swiggy यासारख्या कंपन्यांच्या प्रतिनिधींची सरकारनं बैठक घेतली होती आणि जलद वस्तू पोहोचवण्याच्या संदर्भात काळजी व्यक्त केली होती. Blinkit नं त्यांच्या जाहिरातींमधून १० मिनिटात डिलिव्हरीचं आश्वासन काढून टाकलं आहे. येत्या काही दिवसात इतरही कंपन्या याची अंमलबजावणी करण्याची शक्यता आहे.

<><><><><>

जम्मू-काश्मिरमधलं शक्सम खोरं हे भारताचंच असल्याचा पुनरुच्चार लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी केला आहे. नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. यासंदर्भात १९६३ मध्ये चीन आणि पाकिस्तान यांच्यात झालेला

करार अवैध असल्याची भूमिका त्यांनी मांडली. चीननं या खोऱ्यावर दावा केला होता. त्यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला द्विवेदी उत्तर देत होते.

**<><><><><><>**

देशाची युवा पिढी अंमली पदार्थांपासून मुक्त, आरोग्यपूर्ण आणि ध्येयवादी असेल, तरच विकसित भारताचं स्वप्न साकार होईल, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज केलं. दिल्ली विद्यापीठाच्या अंमली पदार्थमुक्त परिसर मोहिमेला ते संबोधित करत होते. यादृष्टीनं तयार केलेला ई-शपथ मंच आणि मोबाईल ॲपचं अनावरणही उपराष्ट्रपतींच्या हस्ते यावेळी झालं.

**<><><><><><>**

पीएफआरडीए अर्थात निवृत्तीवेतन निधी नियामक आणि विकास प्राधिकरणानं NPS अर्थात राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेच्या खात्यातून काढता येणाऱ्या रकमेसंदर्भात मार्गदर्शक तत्वं आणि नियम तयार करण्यासाठी एका उच्चस्तरीय समितीची स्थापना केली आहे. ही कार्यवाही पीएफआरडीएच्या कायद्यातल्या तरतुदींशी सुसंगत असल्याचं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे. या १५ सदस्यीय समितीच्या अध्यक्षपदावर इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी बोर्ड ऑफ इंडियाचे माजी अध्यक्ष डॉ. एम. एस. साहू असतील. या समितीत विधी, वित्त, विमा, भांडवली बाजार आणि शिक्षण यांच्यासह विविध क्षेत्रातल्या तज्ज्ञांचा समावेश आहे.

**<><><><><><>**

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज नवी मुंबईत डी वाय पाटील स्टेडियमवर मुंबई इंडियन्सचा सामना गुजरात जायंट्सबरोबर होत आहे. मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.
शेवटची बातमी हाती आली तेव्हा गुजरात जायंट्सच्या ८ षटकात २ बाद ८२ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><><>//**